# प्रेस नोट

१) दि. २२/०९/२०२१ व २४/०९/२०२१ या कालावधीमध्ये नवी मुंबई आस्थापनेवर  नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये पोलीस शिपाई पदासाठी लेखी परीक्षा एकुण १२ केंद्रांवर घेण्यात येणार आहे. त्याकरिता सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात सीआरपीसी १४४ लागु करण्याबाबत योग्य ते आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करण्याबाबत सुचना झालेल्या आहेत.

२) सदर परीक्षा या शांतता, निर्भय व निर्विघ्न वातावरणात पार पडाव्यात याकरीता नवी मुंबई आयुक्तालयाचे हद्दीतील १२ परीक्षा केंद्र व त्या केंद्रांपासुन १०० मीटर परिसरात मनाई आदेश जारी करण्यात आलेला आहे.

३) सदर परीक्षेसाठी झेरॉक्स मशीन, लॅपटॉप, फॅक्स मशीन, मोबाईल फोन, पेजर, कॉर्डलेस फोन, स्मार्ट वॉच विथ मोबाईल फोन, व्हॉटस् ॲप अगर इतर कोणतेही संदेशवाहक यंत्र बाळगता व वापरता येणार नाही.

४) ज्याठिकाणी परीक्षा आहे त्या परिसरात एकत्र जमणे, घोषणाबाजी किंवा निदर्शने करणे, परिक्षा केंद्रांवर येणाऱ्या परीक्षार्थींवर प्रभाव टाकण्यासाठी कोणतेही कृत्य करणे तसेच ते परीक्षा देण्यापासून वंचीत राहतील असे कोणतेही कृत्य करू नये.

५) कोणत्याही प्रकारची शस्त्रे, अग्निशस्त्रे, ज्वालाग्रही व दाहक पदार्थ जवळ बाळगता अथवा वाहुन नेता येणार नाहीत.

६) या आदेशाचा भंग करणारा इसम भा.द.वि.क.१८८ प्रमाणे कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
यांच्या आदेशान्वये